# बोर्ड प्रश्नपत्रिका : मार्च २०२४

## इतिहास

**वेळ: ३ तास** **एकूण गुण : ८०**

**सूचना:**

(१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.

(२) उजव्या बाजूस गुण दर्शवलेले आहेत.

(३) उत्तरपत्रिकेमध्ये आकृत्या पेनानेच काढाव्यात.

(४) प्रत्येक प्रश्नाचे उत्तर नवीन पानावर लिहावे.

**प्र.१. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा.** **(६) [१०]**

(१) इ.स. १४४० ________ याने छापखाना सुरू केला.

(अ) जेम्स वॅट (ब) गुटेनबर्ग

(क) ॲरिस्टॉटल (ड) होमर

(२) अमेरिकेच्या 'स्वांतत्र्याचा जाहीरनामा' ________ याने तयार केला.

(अ) जॉर्ज वॉशिंग्टन (ब) थॉमस जेफरसन

(क) लॉर्ड ॲमहर्स्ट (ड) लॉर्ड कॉर्नवॉलिस

(३) पानिपतचे तिसरे युद्ध, मराठे आणि ________ यांच्यात झाले.

(अ) इंग्रज (ब) अब्दाली

(क) अहमदखान बंगश (ड) नजीबखान

(४) अमेरिकेने जपानच्या ________ या शहरावर पहिला अणुबॉम्ब टाकला.

(अ) नागासाकी (ब) हिरोशिमा

(क) पर्ल हार्बर (ड) स्टॉलिनग्राड

(५) सिएटो संघटनेचे मुख्यालय ________ येथे होते.

(अ) थायलंड (ब) फिलीपाईन्स

(क) पाकिस्तान (ड) ग्रेट ब्रिटन

(६) स्वामी विवेकानंद यांचा जन्म दिवस ________ म्हणून साजरा केला.

(अ) राष्ट्रीय शिक्षण दिन (ब) राष्ट्रीय युवक दिन

(क) राष्ट्रीय एकात्मता दिन (ड) राष्ट्रीय विज्ञान दिन

**(ब) पुढील प्रत्येक संचातील 'ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.** **(४)**

(१)

| | **'अ' गट** | | **'ब' गट** |
|---|---|---|---|
| (अ) | अर्सबिश्पु | – | मुख्य कार्यकारी अधिकारी न्यायाधीश |
| (ब) | शान्सेलर | – | न्यायाधीश |
| (क) | वेदोर द फझेंद | – | मालमत्तेवरील अधिकारी |
| (ड) | कपितांव | – | कॅप्टन |



Target Publications

(२) **'अ' गट** — **'ब' गट**

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (अ) | हैदराबाद संस्थानाचे विलीनीकरण | – | स्वामी रामानंद तीर्थ |
| (ब) | काश्मीर संस्थानाचे विलीनीकरण | – | शेख अब्दुल्ला |
| (क) | गोवा मुक्ती लढ्यातील योगदान | – | मोहन रानडे |
| (ड) | पुदुच्चेरी येथील कामगार नेते | – | व्ही. सुबय्या |

(३)

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (अ) | सेंटो कराराचे मुख्यालय | – | अंकारा |
| (ब) | सार्क संघटनेचे मुख्यालय | – | नवी दिल्ली |
| (क) | राष्ट्रकुल संघटनेचे सचिवालय | – | लंडन |
| (ड) | नाटो संघटनेचे मुख्यालय | – | पॅरीस |

(४)

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (i) | राष्ट्रीय मानवाधिकार आयोग | – | मानवी हक्कांचे संरक्षण |
| (ii) | सेंटर फॉर सायन्स अॅन्ड एनव्हायरमेंट | – | दिल्लीतील प्रदूषणाचा अभ्यास |
| (iii) | सी-स्कॅप | – | कासवांचे जतन करणारी संस्था |
| (ड) | इंटॅक | – | वारसा विषयी जतन व जागृती करणारी संस्था |

**प्र.२. (अ) ऐतिहासिक व्यक्ती, ठिकाण, घटना यासंबंधीची नावे लिहा.** (४)[८]

(१) इ. स. १४९८ मध्ये भारतात येणारा पोर्तुगीज दर्यावर्दी -

(२) भारत स्वतंत्र झाला त्यावेळी भारतात विलीन न झालेले सौराष्ट्रातील संस्थान -

(३) दुसऱ्या महायुद्धानंतर निर्वसाहतीकरणाच्या कार्यात मोलाचे योगदान देणारी संघटना -

(४) इ. स. २००२ मध्ये मेट्रो सेवा सुरू झालेले शहर-

**(ब) दिलेल्या कारणांपैकी योग्य कारण निवडून विधाने पूर्ण करा.** (४)

(१) औद्योगिक क्रांती इंग्लंड मध्ये सुरू झाली कारण -

(अ) इंग्लंड हा मोठा देश होता.
(ब) इंग्लंडमध्ये भांडवलदार व कामगार वर्ग अस्तित्वात होता.
(क) इंग्लंडमध्ये मोठी बाजारपेठ अस्तित्वात होती.
(ड) औद्योगिक क्रांती मर्यादित स्वरूपाची होती.

(२) म्यानमारचा कब्जा मिळविणे हे ब्रिटीशांचे उद्‌दिष्ट होते. कारण –

(अ) ब्रिटीशांना साम्राज्य विस्तार करायचा होता.
(ब) म्यानमारमधील नैसर्गिक साधनसंपत्ती आणि हक्काची बाजारपेठ यांवर ताबा मिळविणे ब्रिटीशांच्या दृष्टीने महत्त्वाचे होते.
(क) ब्रिटीशांना युरोपीय वसाहतवादी स्पर्धेत पुढे राहायचे होते.
(ड) म्यानमारचा राजा थिबा याला धडा शिकवायचा होता.

(३) छत्रपती शिवाजी महाराजांनी मिठाच्या व्यापारावर संरक्षक जकाती उभारल्या कारण -

(अ) पोर्तुगीजांना विरोध करण्यासाठी.
(ब) इंग्रजांचा मिठाचा व्यापार मोडून काढण्यासाठी.
(क) स्वराज्यात पैसा उभा करण्यासाठी
(ड) वसाहतवाद्यांना विरोध करण्यासाठी.

Target Publications

(४) दुसऱ्या महायुद्धात जपानने शरणागती पत्करली कारण -

(अ) अमेरिकेने जपानशी तहनामा केला.

(ब) अमेरिकेने जपानच्या हिरोशिमा व नागासाकी या शहरांवर अणुबॉम्ब टाकला.

(क) जपानची अर्थव्यवस्था नष्ट झाली होती.

(ड) जपानच्या नागरिकांनी युद्धाला विरोध केला होता.

**प्र.३. (अ) पुढील नकाशाचे निरीक्षण करून प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(५) [१३]**




(१) सदर नकाशा कोणत्या विषयाशी संबंधित आहे?

(२) वर्तमान बांगलादेशातील १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्यातील कोणतेही एक नाव लिहा.

(३) वर्तमान पाकिस्तानातील १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्यातील कोणतेही एक नाव लिहा

(४) विद्यमान महाराष्ट्रातील १८५७ स्वातंत्र्यलढ्यातील कोणतेही एक नाव लिहा ?

(५) अरबी समुद्रातील भारतीय बेटाचे नाव काय आहे?

**(ब)** **दिलेली संकल्पनाचित्रे पूर्ण करा (कोणतीही चार).** **(८)**

(१)




(२)




(३)




(४)




(५)




Target Publications

(६)




**प्र.४. (अ) संक्षिप्त टिपा लिहा (कोणत्याही तीन).** **(६) [१५]**

(१) आर्थिक राष्ट्रवाद

(२) प्रार्थना समाज

(३) निर्वसाहतीकरण

(४) बांडुंग परिषद

(५) भारत सरकारचे युवक धोरण

**(ब) पुढील विधाने सकारण स्पष्ट करा (कोणतीही तीन).** **(९)**

(१) युरोपातील १५-१६वे शतक हा प्रबोधनाचा उत्कर्ष काळ समजला जातो.

(२) पोर्तुगीजांशी लढा देणे भारतीय सत्ताधीशांना अवघड झाले.

(३) इंग्लंडने भारतातून काढता पाय घेण्याचा निर्णय घेतला.

(४) सार्क संघटनेला काही प्रमाणात यश मिळले.

(५) १९९३ मध्ये मानव अधिकार संरक्षण कायदा करण्यात आला.

**प्र.५. खालील विधानांवर तुमचे मत नोंदवा (कोणतेही तीन).** **[९]**

(१) अमेरिकेतील वसाहतींमुळे स्पेनची भरभराट झाली.

(२) छत्रपती शिवाजी महाराजांनी आरमार दल उभारले.

(३) १८५७ चे स्वातंत्र्ययुद्ध हे स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या मते पहिले स्वातंत्र्ययुद्ध होते.

(४) राष्ट्रसंघाने स्वीकारलेली विश्वस्त पद्धती अपयशी ठरली.

(५) भारत अवकाश संशोधन क्षेत्रातील अग्रणी देश आहे.

**प्र.६. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही दोन).** **[१०]**

(१) युरोपातील धर्मयुद्धाच्या अपयशाची कारणे व परिणाम स्पष्ट करा.

(२) काश्मीरच्या भारतातील विलीनीकरणाची माहिती लिहा.

(३) भारताच्या संरक्षण क्षेत्रातील घडामोडी स्पष्ट करा.

**प्र.७. खालील प्रश्नांची दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही तीन).** **[१५]**

(१) वसाहतवादाचे स्वरूप स्पष्ट करा :

(अ) वसाहतवादाचा अर्थ

(ब) वसाहतवादाची कारणे

(क) वसाहतवादाचे परिणाम

(२) पोर्तुगीज-मराठे संबंध स्पष्ट करा :

(अ) पोर्तुगीज – छत्रपती शिवाजी महाराज

(ब) पोर्तुगीज – छत्रपती संभाजी महाराज

(क) पोर्तुगीज – छत्रपती शाहू महाराज

Target Publications

(३) भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनाची माहीती लिहा:
  (अ) पहिले अधिवेशन
  (ब) हजर प्रतिनिधी
  (क) संमत झालेले ठराव

(४) पहिल्या महायुद्धाची कारणे लिहा :
  (अ) साम्राज्यवादी धोरण
  (ब) शस्त्रवाढ स्पर्धा
  (क) तात्कालिक कारण

(५) राष्ट्रकुल संघटनेची माहिती लिहा :
  (अ) संघटनेचा उद्देश
  (ब) संघटनेची स्थापना
  (क) फायदे

Target Publications